# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

## रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २६-२३** **दिनांक :- २६/०१/२०२३**

**फर्निचर बनविण्याचे काम देण्याची बतावणी करुन फसवणुक करणाऱ्या आरोपीतास अटक नवघर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.**

दि.२१/०१/२०२३ रोजी फिर्यादी नामे अर्जुन रामलखन विश्वकर्मा, वय ४२ वर्षे, व्यवसाय फर्निचर, रा. भाग्यनगर चाळ, कामत घर, धामणकर नाका, भिवंडी, ठाणे यांना अरविंद गुप्ता याने त्याच्याकडील मोबाईलवरुन संपर्क करुन मिरारोड येथील हॉटेलच्या फर्निचरचे काम देतो असे सांगितले. त्यानुसार फिर्यादी हे अरविंद गुप्ता यांना भेटले असता त्याने त्यांची ओळख संतोष पांडे याच्याशी करुन दिली. सदरवेळी हॉटेलमध्ये १५० बेडचे व कपाटांचे काम असल्याचे सांगून त्यांच्याकडून ॲग्रीमेंट करावे लागेल असे कारण सांगून प्रथम ११,३००/- रु. घेतले तसेच काम मिळविण्यासाठी ५०,०००/- रु. खर्च येईल असे सांगून त्याच्याकडून दुस-या वेळेस २०,०००/- रु. संतोष पांडे याने घेवून त्यांना फर्निचर बनविण्याचे काम न देता व त्यांनी दिलेले पैसे परत न करता त्यांची फसवणुक केली. म्हणून फिर्यादी यांनी दि.२४/०१/२०२३ रोजी नवघर पोलीस ठाणेत दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपीतांविरुध्द गुन्हा रजि. नं. I ५१/२०२३ भा.द.वि कलम ४२० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने वरिष्ठांच्या सूचना व मार्गदर्शकाप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे नमूद गुन्हयात आरोपी नामे संतोषकुमार उर्फ पन्नालाल बुधीराम पांडे, वय ५५ वर्षे, रा. कृष्णा चाळ, डि.के मेमोरीयल हायस्कुल, खैरपाडा, वालीव, वसई यास खैरपाडा येथुन ताब्यात घेतले. सदर गुन्हयात त्याचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास दिनांक २४/०१/२०२३ रोजी अटक करुन त्याच्याकडून गुन्हयातील २०,०००/ रुपये इतकी रोख रक्कम हस्तगत करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१, डॉ. शशीकांत भोसले, सहायक पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पो.नि.सुशीलकुमार शिंदे (गुन्हे), स.पो.नि. योगेश काळे, पोउनि अभिजीत लांडे, पोहवा. भुषण पाटील, नवनाथ घुगे, सुरेश चव्हाण, पो.अं. सुरज घुनावत, ओंमकार यादव यांनी केलेली आहे.

-------------ooooo-------------